## संपादकीय

### ‘डिफेन्स क्लस्टर’ ची प्रतीक्षा

रक्षण उत्पादन क्षेत्रात देशाने गेल्या काही वर्षांत प्रगतीचा नवा अध्याय लिहिला आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी जाहीर केल्यानुसार, २०१४ मध्ये केवळ ६०० कोटी रुपयांचे असलेले देशांतर्गत संरक्षण उत्पादन २०२४मध्ये तब्बल २४ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. २०२९पर्यंत ५० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासाठी ‘संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर’ ही एक ऐतिहासिक संधी आहे. या कॉरिडॉरमध्ये पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक, धुळे आणि नागपूर यांचा समावेश असणार आहे. या कॉरिडॉरमध्ये छत्रपती संभाजीनगरला प्रमुख केंद्रबिंदू करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मराठवाड्याची औद्योगिक राजधानी म्हणून आधीपासूनच विकसित असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑरिक, चिकलठाणा, वाळुज, शेंद्रा, बिडकीन यांसारख्या औद्योगिक क्षेत्रांत जगप्रसिद्ध कंपन्या उत्पादन करतात. वाहन, यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, कृषी आदी विविध क्षेत्रांतील उद्योग येथे आहेत. संरक्षण उत्पादनासाठी आवश्यक असलेली अचूक अभियांत्रिकी व कुशल मनुष्यबळ येथे सहज उपलब्ध आहे.

संरक्षण उद्योगासाठी स्वतंत्र ‘क्लस्टर’ उभारले गेल्यास गुंतवणुकीला चालना मिळू शकते. स्थानिक उद्योगांना मोठ्या प्रकल्पांच्या पुरवठा साखळीत सामील होण्याची संधी मिळेल आणि युवकांसाठी हजारो रोजगारनिर्मिती होईल. पाच हजारांहून अधिक संरक्षण उत्पादने देशांतर्गत तयार करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. अशा वेळी छत्रपती संभाजीनगरमधील ‘डिफेन्स क्लस्टर’ आणि महाराष्ट्रात होऊ घातलेल्या ‘डिफेन्स कॉरिडॉर’मध्ये होणारा समावेश या राष्ट्रीय उद्दिष्टाला हातभार लावू शकेल.

राज्य सरकार आठ हजार एकर औद्योगिक जमीन संपादन करण्याच्या तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर एक हजार एकरांचे ‘डिफेन्स पार्क’ छत्रपती संभाजीनगरमध्ये विकसित करणे तितकेच व्यवहार्य ठरेल. चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर (सीएमआयए) या औद्योगिक संघटनेने ऑरिक-बिडकीन, आरापूर एमआयडीसी तसेच समृद्धी महामार्गावरील नोड यांसारखी ही ठिकाणे यासाठी सुचविली आहेत.

‘सीएमआयए’कडून डिफेन्स क्लस्टरची मागणी २०१६पासून सातत्याने होत आहे. गोवा येथे झालेल्या ‘डिफएक्सो इंडिया २०१६’मध्ये येथील १६ प्रमुख संरक्षण पुरवठादार कंपन्यांनी सहभाग घेतला होता. तेव्हाच संरक्षण क्षेत्रातील सामर्थ्य देशासमोर आणण्यात आले. त्यानंतर केंद्राचे तत्कालीन वाणिज्य व उद्योग मंत्री सुरेश प्रभू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी अनेकदा छत्रपती संभाजीनगरमध्ये ‘डिफेन्स क्लस्टर’ उभारण्याचे संकेत दिले होते.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्याची वेळ आली आहे. संरक्षण उद्योग फक्त मोठ्या कंपन्यांपुरता मर्यादित नाही. आज शहरात अनेक स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघू व मध्य उद्योग ड्रोन, एव्हिओनिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि प्रगत सेन्सर्ससारख्या क्षेत्रांत काम करत आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये ‘डिफेन्स क्लस्टर’ उभारल्यास या उद्योजकांना थेट संरक्षण पुरवठा साखळीत प्रवेश मिळू शकतो. यामुळे स्थानिक उद्योजकतेला चालना मिळेल.


भारताचा संरक्षण आयातीवरील खर्च कमी करणे आणि देशांतर्गत तंत्रज्ञान व उत्पादन क्षमता वाढवणे हे आत्मनिर्भर भारताचे ध्येय आहे. ‘डिफेन्स क्लस्टर’ या उद्दिष्टपूर्तीसाठी निर्णायक ठरू शकते. एकदा मोठ्या प्रकल्पाची स्थापना झाली, की इतर पुरवठादार व सहायक उद्योग आपोआप येथे आकर्षित होतील आणि संपूर्ण संरक्षण इकोसिस्टीम विकसित होईल. छत्रपती संभाजीनगरातील औद्योगिक वसाहतीत ‘डिफेन्स क्लस्टर’ची औपचारिक घोषणा कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची आज म्हणजे २४ ऑगस्ट रोजी १४५ वि जयंती जयंती आहे. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा



विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा (मियते) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवयित्री ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांना १४५ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

# पुण्यातील मानाचे-प्रसिद्ध गणपती

## (भाग - १)

गणेशोत्सवाचे आगमनाआधीच पुण्यामध्ये एकच लगबग असते. बाजारपेठा हार, मुकुट, निरनिराळे आकर्षक वस्त्र, सजावटीच्या साहित्याने गजबजल्या असतात. आकर्षक गणपतीच्या मूर्ती आपले लक्ष वेधून घेतात. महिनाभर आधीच मुर्त्यांचे बुकिंग सुरु झाले असते. गणपती म्हणजे विद्येची देवता. पुणे म्हणजे विद्येचं माहेरघर. पुणे म्हणजे सांस्कृतिक राजधानी, सुसंस्कृत शहर म्हणून पुण्याची विशेष ओळख आहे. पुण्याला प्राचीन आणि ऐतिहासिक नगरी म्हटलं जातं. पुण्यात वर्षभर सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक आणि राजकीय अशा सगळ्याच प्रकारच्या कार्यक्रमांची रेलचेल असते. अनेक विशेष कार्यक्रम आयोजित केलेले असतात. आणि म्हणूनच ‘पुणे तिथे काय उणे नेहमीच म्हटले जाते पुण्यातील अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत.

पुण्यातील गणेशोत्सवांचा नावलौकिक जगभर आहे. गणेशोत्सव म्हणजे पुणे. पुण्याची वैभवशाली परंपरा आहे. पुण्यातील इतिहासकालीन प्राचीन मंदिरांची स्वतःची अशी वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येकामागे काहीतरी



आख्यायिका आहेत. प्रत्येक मंदिराचे महत्त्व विशद करताना ते आपणास दिसून येते. पुण्यात गणपतीच्या दर्शनासाठी जगभरातून लोक येतात. महाराष्ट्रात सगळीकडेच गणेशोत्सव जोरदार साजरा केला जातो.पुण्यात विशेष म्हणजे गणेशोत्सवाच्या काळात म्हणजे स्थापनेपासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत लाखोंच्या संख्येने भावीक पुण्याचे गणपती पाहण्यासाठी मुद्दाम येत असतात.दोनचार दिवस मुक्काम करून ते गणपती दर्शन घेत असतात. त्यामुळे या काळात पुण्यामध्ये एक वेगळच वातावरण निर्माण झालेले असते.उत्साहबरोबरीने रस्तेही ओसंडून वाहात असतात. गणपती समोरचे निरनिराळ्या प्रकारचे देखावे मनाला आकर्षित करुन घेतात. या काळात पुण्यातील सर्वच लॉज फुल असतात. ऍडव्हान्स मध्ये बुकिंग करून ठेवले असते.

पुण्यात आल्यानंतर मानाचे गणपती म्हटले जातात त्यासोबत अजूनही प्रसिद्ध मानाचे गणपती आहेत. ती नेमकी कोणती आहेत आपण बघू. ज्यावेळी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले गेले आणि गणपतीच्या मिरवणुकीचा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेला लोकमान्य टिळक, भाऊसाहेब रंगारी, खाजगीवाले, घोटावडेकर, आणि ब्रह्मवृंद यांनी व्यवस्थेचा एक भाग म्हणून त्यावेळेला ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीला पहिला अग्रक्रम दिला तसेच ग्रामदेवता असलेल्या तांबडा जोगेश्वरी गणपतीला दुसरा क्रम दिला हा व्यवस्थेचा भाग म्हणून होते. अर्थातच सर्वच गणपती हे मानाचे आहेत. आपण त्यांच्या मानाचे क्रम ठरवणारे कोण ? आपण त्यांचा क्रम लावू शकत नाही. गजानना श्री गणराया.. आधी वंदू तुज मोरया.. यातच सर्व आले.

**पुण्यातील प्रसिद्ध गणपती (मानाचे गणपती) खालीलप्रमाणे आहेत :**

**१) कसबा गणपती हे पुण्याची ग्रामदैवत आहे.**

शहरातील पहिला पानाचा गणपती म्हणून ओळख आहे. या गणपतीची स्थापना जरी जिजाऊंनी केली असली तरी १८९३ मध्ये मंडळाद्वारे सुरुवात झाली.

मानाच्या गणपतींपैकी पहिला गणपती म्हणजे पुण्याचे प्रमुख दैवत असणारा कसबा गणपती. या गणपतीची स्थापना जरी जिजाऊंनी केली कसबा गणपती हा तांदळा स्वरूपात आहे. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, या गणपतीच्या डोळ्यांत हिरे आणि नाभीस्थानी माणिक बसवलेला आहे. ह्या मूर्तीकडे पाहिल्यानंतर अष्टविनायकातील बल्लाळेश्वर मूर्तीचा भास होतो असे म्हणतात. मूर्तीला चांदीची महिरप केली गेली आहे. गेली १३० वर्षे गणेशोत्सवासाठी घडविल्या जाणार्या मूर्तीचे आगमन आणि विसर्जन हे चांदीच्या पालखीतून होत असते. नवसाला पावणारा, अशी या स्वयंभू गणेशाची ख्याती आहे.

**२) तांबडी जोगेश्वरी गणपती हा गणपती पुण्यातील दुसरा मानाचा गणपती आहे.**

यानंतर मान येतो तो तांबडी जोगेश्वरीच्या गणपतीचा.. पुण्याची ग्रामदेवता म्हणून तांबडी जोगेश्वरीला ओळखले जाते. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, याचे श्रीमुख हे आफ्रिकन हत्तीचा चेहरा आहे. आगमनाची मिरवणूक ही रथातून, तर विसर्जन हे पालखीतून केले जाते. सुरुवातीला देव्हारा हा पितळेचा होता. काही काळानंतर मंडळाच्या सभासदांनी दिलेल्या देणगीतून चांदीचा देव्हारा बनवून मूर्तिपूजन केले जाते. कमळावर बसलेला सोन्याचांदीच्या आभूषणांनी संपन्न असा हा गणपती आहे. वेगवेगळ्या प्रकारचे मुकुट असले तरीही हिरेजडित असा एक सोन्याचा हार हा कायमच गजाननाच्या गळ्यात असतो. गणपती बाप्पाला पुणेरी पगडीदेखील घातली जाते. अतिशय सुंदर प्रकारे सोवळे नेसवले जाते. विसर्जनाच्या वेळी तर चांदीच्या पालखीसोबतच छत्र चामरे, नक्षत्रमाला, अब्दागिर्या हे मिरवणुकीची शोभा वाढवतात. एकूणच गजाननाचे स्वरूप हे चैतन्यमय असते.

**३) गुरुजी तालीम गणपती हा तिसरा मानाचा गणपती आहे.**

यानंतर येणारा गणपती म्हणजेच गुरुजी तालीम मंडळ. १८५७ साली स्थापन झालेल्या या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे हा उंदरावर (मूषकावर) विराजमान आहे. पाहायला अतिशय लोभसवाणा हा गणपती कलाकृतीचा उत्तम नमुना असणारे मुकुट, विविध आयुधे, हार ह्यांनी सजलेला आहे. शोभा वाढविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे हिरेमाणिक दागिन्यांमध्ये आहेत. मिरवणुकीच्या काळात तर विविध ढोलताशा, लेझीम पथक गणपतीच्या विसर्जनात एक वेगळा रंग भरतात.

**४) तुळशीबाग गणपती पुण्यातील चौथा मानाचा गणपती आहे.**

पुण्यातल्या अतिशय प्रसिद्ध जागांपैकी एक तुळशीबाग हे ठिकाण आहे येथील गणपतीला मानाचा चौथा गणपती मानले जाते. १९०१ मध्ये या गणपतीची स्थापना करण्यात आली. १९७५ मध्ये पहिल्यांदा फायबरची मूर्ती स्थापित करणारे हे पहिले मंडळ ठरले. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, ही तेरा फूट उंच असून अनेक सुंदर कल्पक अशा आभूषणांनी सजवली जाते. तुळशीबागेतील ह्या मूर्तीची सजावट डोळ्यांना दिपवणारी असते. ह्या गणपतीला मागे चांदीची महिरप असून सोबतच मुकुट, कान, पाय, हात, आयुध, उंदीर, मोदक, नाग तसेच सोंडपट्टी आणि पाटदेखील चांदीचा आहे. साधारणपणे २०० किलोहून अधिक चांदीचे आभूषणे आहेत. रेशीम तसेच मलमलची सोवळी, उपरणी ही बाप्पासाठी तयार केली जातात. इतकेच नाही तर जगभरातील अनेक भक्तगण सोन्याचांदीचे दूर्वा, मोदक यांसारखी तत्सम आभूषणे देवाला अर्पणदेखील करतात. सगळ्यांचा लाडका असणार्या गजाननाची गजाननाचे लाड प्रत्येक जण आपापल्या कुवतीनुसार करताना दिसतात. मंडळातर्फे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अन्नदान सेवा त्यांच्याकडून राबवली जाते. दरवर्षी यज्ञ केला जातो.

**५) केसरी वाडा गणपती हा पुण्यातील पाचवा मानाचा गणपती आहे.**

सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवण्यात टिळकांचा पुढाकार असल्याने मानाचा पाचवा गणपती म्हणून त्यांनीच स्थापना केलेल्या केसरीवाड्याच्या गणपतीला ओळखले जाते. हे मंडळ अत्यंत उत्साहात, परंपरेचे पालन करीत गणेशोत्सव साजरा करतात. गायकवाड यांनी हा वाडा बांधला असून सध्या इथे दोन गणपतींची पूजा केली जाते. त्यापैकी एका मूर्तीची कायमस्वरूपी स्थापना केलेली असून दुसरी मूर्ती ही गणेशोत्सवात दहा दिवस पूजली जाते आणि मग विसर्जित केली जाते. कायमस्वरूपी मूर्ती ही चांदीची आहे जी ज्ञानेश्वरीतील वर्णनाप्रमाणे घडविली आहे. मूर्तीला सहा हात असून हातांत परशू, पाशांकुश, चंद्र आणि हस्तिदंत आहेत. मूर्तीला पगडी घातली जाते. ऐतिहासिक घडामोडींचा वारसा असल्याने केसरीवाड्याला एक महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकमान्य टिळकांच्या विचारांचा वसा आजही मंडळ अविरतपणे पुढे सुरू ठेवले असल्याचे पाहायला मिळते.

**अजूनही पुण्यात मानाचे काही प्रसिद्ध गणपती आहेत. त्यांचा परिचय पुढील भागात...**

क्रमश :



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव
मोबा. ८९९९५६६९१७

## आरोप..

सत्ताधारी विरोधका
अहोरात्र का आरोप
निरामय राजकारणा
रूजवले भांगेचे रोप

डोके नाही जागेवरी
सजवी मात्र जिरेटोप
कळून चुकले कारण
सत्तेसाठीचं खटाटोप

निदान गहन प्रश्नावर
चर्चाघडाव्या निकोप
एकजूट अपेक्षित हो
देशावर संकटप्रकोप

दुषीत निर्मळ सुसृष्टी
सुखददृष्टिचा आटोप
संशयातगंजली नजर
केवळ करे अध्यारोप

काल होता भले मित्र
आजकसला विकोप
कंटाळून साठमारीला
जनताच देईलं निरोप

मनशुद्ध रे करण्यास
कुठूनि आणावा सोप
कधी तरी सुधार होई
आशा ना झाली लोप

- हेमंत मुसरीफ, पुणे
मो. ९७३०३०६९९६

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२